सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड इमारत, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
Email Id: contact-secretary@mpsc.gov.in Website: https://mpsc.gov.in, https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc ०२२-६९३८५९००

क्रमांक : एलजेआर-१९२७/प्र.क्र.५६५/२०२४/जाहिरात दिनांक : २३ ऑक्टोबर, २०२६

## शुद्धिपत्रक

**विषय :- दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग पूर्व परीक्षा २०२४, परीक्षेकरीता विधी शाखेतील नवीन पदवीधर उमेदवारांचे अर्ज स्वीकारण्याबाबत**
**संदर्भ : जाहिरात क्रमांक ०१३/२०२६, दिनांक ३० एप्रिल, २०२६ आणि दिनांक ०७ जुलै, २०२६ रोजीचे प्रसिद्धीपत्रक**

आयोगामार्फत दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग पूर्व परीक्षा – २०२४, जा.क्र. ०१३/२०२६ करीता दिनांक ३० एप्रिल, २०२६ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल रिट याचिका (सिव्हील) क्र १११०/२०२५ प्रकरणी मा. न्यायालयाच्या दिनांक २१ ऑगस्ट, २०२६ रोजी च्या आदेशानुसार व त्याअनुषंगाने शासन पत्र, विधी व न्याय विभाग, क्रमांक : सीजेएम-१३२३/१०२६/प्र.क्र.१४२/कार्या-३ दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२६ अन्वये कळविल्यानुसार "All Law Graduates who have obtained Degree in Law, prior to one year from the date of the Judgment dated २१.०८.२०२६ in Bhumika Trust V/s. Union of India & Ors. (Writ Petition (Civil) No. १११०/२०२५) shall be deemed to have completed one year of active practice" सदर आदेशानुसार विधी शाखेतील ज्या नवीन पदवीधर उमेदवारांनी दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ पूर्वी विधी शाखेतील पदवी संपादित केली आहे, अशा सर्व उमेदवारांकडून विषयांकित परीक्षेच्या जाहिरातीमध्ये तसेच सदर शुद्धिपत्रकामध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांकडून आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज सादर करण्याचा कालावधी खालीलप्रमाणे राहील :-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करण्याचा कालावधी | **दिनांक २६ ऑक्टोबर, २०२६ रोजी १४.०० ते दिनांक ०९ नोव्हेंबर, २०२६ रोजी २३:५९** |
| २ | ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | **दिनांक १२ नोव्हेंबर, २०२६ रोजी २३:५९** |
| **चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याची सवतल बंद करण्यात आली असून उमेदवारांनी फक्त ऑनलाईन पद्धतीने (डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, नेट बँकिंग, UPI) शुल्क भरणे आवश्यक आहे.** | | |

२. शुद्धिपत्रकास अनुसरून अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांकरीता किमान व कमाल वयोमर्यादा आणि वयोमर्यादा गणण्याचा दिनांक खालीलप्रमाणे राहील :-

| वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | किमान अमागास/आदुघ/अनाथ/मागासवर्गीय | कमाल | |
|---|---|---|---|
| | | अमागास / आदुघ /अनाथ | मागास वर्गीय/ दिव्यांग |
| जाहिरातीचा दिनांक म्हणजेच दिनांक ३० एप्रिल, २०२६ | २१ | ३५ | ४० |

३. वरीलप्रमाणे परिच्छेद १ मध्ये उल्लेख केलेले विधी शाखेतील पदवीधर उमेदवार तसेच इतर पात्र उमेदवार (३ वर्षाचा वकिली अनुभव पूर्ण न केलेले उमेदवार) यांनी त्यांच्या अर्जाच्या प्रयोजनार्थ एक वर्षाचा सक्रिय वकिलीचा अनुभव पूर्ण केला आहे असे गृहीत धरण्यात येईल. गृहीत धरण्यात आलेल्या एक वर्षाच्या कालावधीच्या समर्थनार्थ त्यांनी स्वतंत्र वकिली अनुभवाचे प्रमाणपत्र (Certificate of Practice) सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

४.......

४. वरीलप्रमाणे परिच्छेद १ मध्ये उल्लेख केलेले विधी शाखेतील नवीन पदवीधर उमेदवारास मराठी भाषा बोलता, वाचता, लिहिता तसेच मराठीमधून इंग्रजीमध्ये आणि इंग्रजीमधून मराठीमध्ये भाषांतर करता येण्याइतके पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे. सदर भाषेच्या ज्ञानापृष्ठ्यर्थ उमेदवाराने ज्या महाविद्यालयातून किंवा विद्यापीठाच्या विभागातून LL.B. अथवा LL.M. पदवीसाठी शिक्षण घेतले आहे, त्या संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य किंवा विद्यापीठ विभागप्रमुख यांचे प्रमाणित केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. सदर प्रमाणपत्राचा सुधारित नमुना आयोगाच्या संकेतस्थळावर Download या सदराखाली उपलब्ध आहे.

५. The candidates (except those who have completed three years of practice as an Advocate on the date of publication of advertisement) selection pursuant to the aforesaid recruitment shall, upon appointment be designated as “Trainee Officers” and shall undergo Judicial further training as specified below :

(i) Trainee Judicial Officer shall undergo a compulsory period of one year of intensive training at the Maharashtra Judicial Academy;

(ii) Upon successful completion of the aforesaid training, the Trainee Judicial Officers shall undergo a further period of one year of structured Law Clerkship. The first six months shall be spent as a Law Clerk under the supervision of the Principal District / District and Sessions Judges or Members of the Higher Judicial Services, and the remaining six months under the supervision of a sitting Judge of l the High Court.

(iii) Upon completion of the Law Clerkship, the sitting Judge of the High Court under whose supervision the Trainee Judicial Officer has served shall submit a reasoned evaluation report concerning suitability the performance and of the trainee. Upon such evaluation being found satisfactory, the Trainee Judicial Officer may be appointed to the regular post of Civil Judge, Junior Division and shall thereafter be entitled to the regular pay scale and other Service benefits attached to the post;

(iv) The Trainee Judicial officers shall be paid a fixed emolument equivalent to one-half of the remuneration payable to a Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate First Class in the State of Maharashtra and in addition, be entitled to the facilities and other benefits ordinarily made available to trainees at the Maharashtra Judicial Academy.”

६. विषयांकित परीक्षेसाठी दिनांक ३० एप्रिल, २०२६ रोजी प्रसिद्ध जाहिरातीमधील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

७. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग पूर्व परीक्षा २०२४ करीता परीक्षेचा दिनांक स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.

उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.